प्रगत शेतीची पाऊलवाट दाखविणारे साप्ताहिक
संपादक : निशिकांत भालेराव

# आधुनिक किसान

किंमत १२ रुपये • दर गुरुवारी
वर्ष १ • अंक ४५ • १३ ते १९ डिसेंबर २०१२



शरद पवार आणि भवरलाल जैन
यांच्या वाढदिवसानिमित्त विशेष लेख

## 'वॉलमार्ट'मध्ये शेतमाल
## शेतकरी होईल
## मालामाल !-?




द्राक्ष, डाळिंब, आंबा, ऊस,
हळद, कांदा,
ज्वारी, गहू, सूर्यफूल
पिकांवरील कीड-रोग नियंत्रण

हिवाळ्यातील दूध
उत्पादन वाढीसाठी उपाय

ऊस उत्पादक
मानेंचे ओबामांकडून कौतुक

मनीषा कुंजीर यांचे
'मिशन कार्नेशन'

# आधुनिक किसान
प्रगत शेतीची पाऊलवाट

**www.adhunikkisan.com**

वर्ष १ | अंक ४५ | १३ डिसेंबर २०१२

**किंमत : १२ रुपये**

वार्षिक वर्गणी : ५०० रुपये

अर्ध वार्षिक वर्गणी : २५० रुपये

वर्गणीचा फॉर्म भरताना कृपया आपले पूर्ण नाव, पत्ता व संपर्क क्रमांक द्यावा.

**अंक दर मंगळवारी पोस्ट केला जातो.**

**संचालक-संपादक** : निशिकांत भालेराव

**संचालक-प्रकाशक** : विनोद अपसिंगेकर

**कन्टेन्ट मॉनिटर** : पंकज जोशी

**असोसिएट कन्टेन्ट मॉनिटर** : प्रकाश जगदाळे

**महाराष्ट्र ब्युरो इन्चार्ज** : शैलेंद्र चव्हाण

**कन्टेन्ट इनोव्हेशन्स** : योगेश थोरात

**लेआऊट्स** : उमेश खंडाळे, कनक वाईकर

**वितरण-संपर्क :**

**फोन/फॅक्स : ०२४०-२३६३१५१/५२**

**जाहिरात-संपर्क : ९८५००४४०८८**

**पत्ता : आधुनिक किसान**

महाकिसान ॲग्रो पब्लिशर्स प्रा. लि.,
दी ओरियन, फ्लॅट नं. २, पदमपुरा,
स्टेशन रोड, कोकणवाडी,
औरंगाबाद - ४३१ ००५
mahakisan.agro@gmail.com

साप्ताहिक 'आधुनिक किसान' आता फेसबुकवरही...

आधुनिक किसानच्या पेजला भेट द्या आणि भरभरून लाईक्स द्या.
**http://www.facebook.com/AdhunikKisan**

'आधुनिक किसान' साप्ताहिक मालक-मुद्रक-प्रकाशक विनोद शामराव अपसिंगेकर यांनी महाकिसान ॲग्रो पब्लिशर्स प्रा. लि. साठी प्रभाकर प्रिंट पॅक (प्रा.) लि., ईएल-२६, एमआयडीसी इंडस्ट्रियल एरिया, चिकलठाणा, औरंगाबाद - ४३१ ००६ येथे छापून **'आधुनिक किसान'** कार्यालय, २, दी ओरियन बिल्डिंग, पदमपुरा सर्कल, कोकणवाडी, स्टेशन रोड, औरंगाबाद - ४३१ ००५ येथून प्रकाशित केले.



या अंकातील मजकुरातील अनेक मतांशी, विचारांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. विविध मतांचा, दृष्टिकोनाचा आदर करूनच या अंकातील मजकुराची रचना केली आहे. मजकुरातील शिफारशी-दावे हे जमीन-पाणी व हवामानाशी संबंधित असल्याने वाचकांनी अंमलबजावणी करताना स्वतःचा निर्णय महत्त्वाचा मानावा.

**© सर्व मजकुराचे हक्क राखून ठेवले आहेत.**


## या अंकात वाचा




# शेतकऱ्यांचे होणार का? 'एफडीआय'मुळे भले

रिटेल (किरकोळ विक्री) क्षेत्रात थेट परकीय गुंतवणुकीस अर्थात्च एफ.डी.आय.ला परवानगी देण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतल्यावर हा निर्णय शेतकरी हिताचा की अहिताचा, असे दोन मतप्रवाह देशांतील राज्यकर्ते आणि शेतकरी संघटनांमध्ये सुरू झाले. लोकसभेत 'एफडीआय' विरोधाचा हा प्रस्ताव फेटाळण्यात आला आणि केंद्र सरकारची सरशी झाली. त्यानंतर राज्यसभेनेही एफ.डी.आय.च्या प्रस्तावावर मोहोर उमटविली आणि रिटेल क्षेत्रातील थेट परकीय गुंतवणुकीचा मार्ग मोकळा झाला. या निर्णयामुळे शेतकऱ्यांना फायदा होणार का तोटा? येणाऱ्या स्पर्धेच्या आणि जागतिकीकरणाच्या काळात शेतकऱ्यांनी बाजाराचे व्यवस्थापन कसे करावे? याबाबतचा खास लेख ...


▶१२



मानेंच्या प्रयोगाने ओबामा चकीत १४◀



आधुनिक शेतीचा दीपस्तंभ १६◀



आगामी काळ कृषी प्रक्रियेचा! २४◀



पॉलीहाऊसमध्ये बहरली कार्नेशन फूलशेती ३०◀

३२▼ प्रगत तंत्रज्ञानातून साधला शेतीचा विकास

३४▼ सल्ला पीक संरक्षणाचा

३७▼ रब्बी ज्वारीवरील कीड, रोग नियंत्रण



जास्त दूध हवे; तर जनावरांची काळजी घ्या! ३८◀



द्राक्ष फवारणीसाठी टिप्स् ३९◀



आता भगवा
जैन टिश्यूकल्चर डाळींब रोपे
गतवर्षी ७.५० लाख रोपांची यशस्वी लागवड
मार्च अखेर २७ लाख रोपांची नोंदणी पूर्ण
वैशिष्ट्ये- निरोगी मातृवृक्षांपासून तयार केलेली • बॅक्टेरिअल इंडेक्सींगसह तंत्रशुद्ध पद्धतीने बनवून हार्डनिंग केलेली • शास्त्रशुद्ध मार्गदर्शन उपलब्ध
वाण- भगवा रु. ३०/- मृदूला रु. २५/- प्रतीरोप-जागेवर
रु.१०/- बुकींगवेळी व उर्वरित रक्कम वितरणासोबत.
जैन इरिगेशन सिस्टीम्स् लि.
कल्पना कणापरी. ब्रह्मांडाचा भेद करी.®
जैन टिश्यूकल्चर
अधिक उत्पादन - अधिकाधिक नफा.
चौकशी - पश्चिम महाराष्ट्र : व्ही.एस.सोनवणे ९४२२७७४९०४, चेतन गुळवे ९४०४९५५३१७
उर्वरित महाराष्ट्र : वि.ज.धाडीवाल ९४२२७७४९६६
बुकींग - ज्ञानेश्वर पाटील ९४२१५६१५८८; शैलेश साखरे ०२५७-२२५८०१७

## भवरलाल जैन यांना 'फोर्ब्ज इंडिया' चा पुरस्कार

'जैन इरिगेशन सिस्टिम्स लि.' चे संस्थापक अध्यक्ष भवरलाल जैन यांच्या सामाजिक योगदानाची दखल घेत 'फोर्ब्ज इंडिया मॅगेझीन'तर्फे त्यांना 'इन्फोसिस'चे मुख्य कार्यकारी अधिकारी एस.डी. शिबूलाल यांच्या हस्ते 'गुड कंपनी अवॉर्ड' प्रदान करण्यात आला. बंगळूरू येथे झालेल्या या कार्यक्रमास 'विप्रो'चे अध्यक्ष अजिम प्रेमजी, 'आयसीआयसीआय'चे माजी अध्यक्ष एन. वागूल, 'ग्लोबल ब्रेव्हरेज'चे विभागीय अध्यक्ष संजीव सरिन, अब्राहम मोसेस, आशिष धवन, टाटा ट्रस्टचे विश्वस्त व सल्लागार सर दोराबजी, ए.एन. सिंग आदींची प्रमुख उपस्थिती होती.

सामाजिक उत्तरदायित्वाचा भाग कंपनीच्या व्यवसाय प्रणालीतच असल्याचे भवरलाल जैन यांनी यावेळी सांगितले. शेतकऱ्यांचा आर्थिक उत्पादनाचा स्रोत कसा वाढेल यासाठी प्रयत्न होत असल्याबद्दल समाधान व्यक्त करून 'जैन इरिगेशन'ने मागील पंचवीस वर्षांपासून आपला ग्राहकवर्ग हा विकासाच्या प्रतीक्षेत उभा असलेला शेतकरी आहे, हे समजून दर्जेदार उत्पादन केल्याचे त्यांनी स्पष्ट केले. *





## 'अंकुर सीड्स' व 'आयसीएआर' तर्फे कृषी संशोधन प्रकल्प राबविणार - डॉ. अय्यपन

अमरावती येथील 'अंकुर सीड्स'च्या ब्रीडिंग सपोर्ट सेंटरच्या प्रयोगशाळेला भारतीय कृषी अनुसंधान परिषदेचे महासंचालक डॉ. एस. अय्यपन यांनी नुकतीच भेट दिली. यावेळी उपम हासंचालक डॉ. स्वपन दत्ता, भारतीय कृषी शास्त्रज्ञ निवड मंडळाचे माजी अध्यक्ष डॉ. सी. डी. मायी, केंद्रीय कापूस संशोधन केंद्राचे संचालक डॉ. केशव क्रांती, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. रविप्रकाश दाणी आदी उपस्थित होते.

'अंकुर सीड्स'चे संचालक रविदादा काशीकर यांनी डॉ. अय्यपन यांचे स्वागत केले. प्रबंध संचालक माधव शेंबेकर यांनी प्रास्ताविक केले. यावेळी डॉ. अय्यपन यांनी 'अंकुर सीड्स'चे अनुसंधान प्रबंधक स्व. लक्ष्मणदादा औरंगाबादकर यांच्या योगदानाबद्दल गौरवोद्गार काढले. 'आयसीएआर' व 'अंकुर सीड्स'च्या माध्यमातून कृषी संशोधन विस्ताराचा उपक्रम संयुक्तपणे राबविण्याचा मानस डॉ. अय्यपन यांनी व्यक्त केला. त्यांनी कपाशी व भाजीपाला पिकांच्या प्रात्यक्षिक प्लॉट्सची पाहणी तसेच 'अंकुर सीड्स'चे संचालक व प्रयोगशाळेतील तज्ज्ञांशी चर्चा केली.

यावेळी डॉ. अश्विन काशीकर, डॉ. शरद निंबाळकर, डॉ. व्ही. जे. शिवणकर, डॉ. दीपक सरकार, डॉ. एस. के. चटोपाध्याय, प्रा. अरविंद खांडेकर, डॉ. रमेश ठाकरे, विजय काशीकर, बी.एम. उमाळकर, दिलीप रोडी आदी उपस्थित होते. डॉ. प्रतीक्षा मायी यांनी सूत्रसंचालन केले, तर डॉ. मंजू विश्वकर्मा यांनी आभार मानले. *

## 'केएसबी'चा 'सेंट्रिजेट' पंपसेट बाजारात



पुणेस्थित 'केएसबी पंप्स' कंपनीने फार खोल नसलेल्या विहिरींवर वापरण्याच्या मोनोब्लॉक पंपसेटचे 'सेंट्रिजेट' हे नवीन मॉडेल बाजारपेठेत आणले आहे. सेंट्रिफ्युगल (अपकेंद्रित) आणि सिंगल-स्टेज अशा संरचनेचे 'सेंट्रिजेट पंपसेट' निवासी बंगले, हॉटेल्स, मळे, लॉन आणि उद्याने इत्यादी ठिकाणी उपयुक्त आहे. याच्या मोटरची रचना व्होल्टेजच्या चढ-उतारांतही काम करण्याच्या दृष्टीने केली आहे. डायनॅमिकली बॅलन्स्ड रोटरमुळे पंपाचे कंपन होत नाही आणि आवाज येत नाही. हे पंपसेट डाय-कास्ट रोटर, हायड्रॉलिक भाग व जॅकेट यांसाठी उच्च प्रतीचे स्टेनलेस स्टील, इंपेलरसाठी ब्राँझ आणि पॉलीरॅप स्टेटर यांचा वापर करून तयार केले जात असल्याने दीर्घकाळ टिकतात. *

भारतात ऊस उत्पादनाची सरासरी एकरी २७ टन एवढी आहे; परंतु एकरी १२० टन उसाचे विक्रमी उत्पादन घेण्याची किमया सांगली जिल्ह्यातील आष्टा (ता. वाळवा, जि. सांगली) येथील प्रगतिशील शेतकरी संजीव माने यांनी साधली आहे. पाणी आणि खताचे योग्य व्यवस्थापन व ठिबक सिंचन तंत्रज्ञान वापरून एवढे उच्चांकी उत्पादन घेणारे माने यांनी ऊस उत्पादक शेतकऱ्यांना व साखर कारखान्यांना नवी दिशा दिली आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष बराक ओबामा हे भारत दौऱ्यावर आले असता, माने यांच्या ऊस उत्पादनातील विक्रमाची माहिती ऐकून आश्चर्यचकीत झाले. त्यावेळी मुंबई भेटीत त्यांनी माने यांच्याशी प्रत्यक्ष चर्चा करून भारतीय शेतीचे तंत्र समजून घेतले.

# मानेंच्या प्रयोगाने ओबामा चकीत

## विक्रमी ऊस उत्पादनाचा किमयागार

आष्टा (ता. वाळवा, जि. सांगली) येथील प्रगतिशील शेतकरी संजीव माने यांनी गेली १० वर्षे सतत एकरी १०० टन उसाचे उत्पादन घेतले आहे. ऊस उत्पादनातील त्यांचा उच्चांक एकरी १२१ टन आहे. पाणी आणि खतांचे उत्तम व्यवस्थापन करून त्याची काटेकोर अंमलबजावणी केली तर शेतीत जास्तीतजास्त उत्पादन घेता येते, हे त्यांनी सिद्ध करून दाखवले आहे.

माने सांगतात की, उसासाठी योग्य जमिनीची निवड आणि माती परीक्षणानुसार खतांचा व जैविकांचा वापर करणे अत्यंत गरजेचे असते. शेतजमिनीत सेंद्रिय पदार्थ उदाहरणार्थ ताग, ढेंचा, गांडूळ खताचा वापर करून ५ फुटांवर सरी सोडली पाहिजे. यासाठी एक डोळा कांडी, दोन फुटांवर अथवा दोन डोळे कांडी एक फुटावर लागण करावी. यासाठी ५०० ते ६०० किलो बियाणे अथवा ८ ते १० हजार एक डोळ्याची कांडी वापरावी. तसेच ठिबक संचाचा वापर करून माती परीक्षणानुसार पिकाच्या अवस्थेबरोबर खते द्यावीत. वेळच्या वेळी बाळबांधणी व मोठी बांधणी करून प्रतिडोळे ४-५ ऊस जोमदार ठेवावे व पाणी नियोजन करून एकरी ४० हजार ते ४५ हजार ऊस राहतील याची काळजी घ्यावी. प्रत्येक ऊस दोन ते अडीच किलोचा या पद्धतीतून भरला जातो. ठिबक संचाची योग्य काळजी घेतल्यास १५ वर्षांपर्यंत संच चांगला राहू शकतो.


**ठिबक सिंचन तंत्रज्ञान वापरून विक्रमी ऊस उत्पादन घेणारे आष्टा (जि. सांगली) येथील शेतकरी संजीव माने आपल्या उसाच्या शेतात.**



### आता १५० टन ऊस उत्पादनाचे उद्दिष्ट

माने यांनी १३ नोव्हेंबर २०१० मध्ये आपल्या अडीच एकर बागेत प्रायोगिक तत्त्वावर जैन इरिगेशनचे 'सबसरफेस' ठिबक सिंचनाचे तंत्र अवलंबले. त्याचा फायदेशीर अनुभव लक्षात घेऊन आजमितीस २० एकरवरील ऊस शेतीत 'सबसरफेस' ठिबक सिंचनाचे तंत्र त्यांनी वैयक्तिक बसविले आहे. एवढेच नव्हे, तर परिसरातील शेतकऱ्यांना प्रोत्साहीत करून १२५ एकरवर ही प्रणाली अमलात आणली आहे. या नवीन तंत्रज्ञानाच्या सहाय्याने आता मी प्रतिएकर १५० टन ऊस उत्पादनाचे उद्दिष्ट गाठण्यात यशस्वी ठरेल, असा विश्वास त्यांनी बोलून दाखविला.

मुंबई भेटीवर आलेले अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष बराक ओबामा यांनी 'जैन इरिगेशन सिस्टिम्स'च्या दालनाची पाहणी केली. त्यावेळी त्यांच्याशी सुसंवाद साधताना संजीव माने.




### 'सबसरफेस' पद्धतीचे फायदे

पारंपरिक ठिबक सिंचनदेखील उसासाठी उत्तम आहे; परंतु 'सबसरफेस' पद्धतीचे अनेक फायदे आहेत. त्यातील प्रमुख तीन फायदे विचारात घेतले तर प्रत्येक शेतकऱ्याने सिंचन प्रणाली अवलंबावी, असे आपण शेतकऱ्यांना नम्रपणे सूचित करू इच्छितो, असे माने सांगतात. सध्या ग्रामीण भागात मजुरांची चणचण भासते. ऊसतोडणीच्यावेळी ठिबकच्या नळ्या आवरण्यासाठी व उसाच्या बेण्याच्या लागवडीवेळी पुन्हा ठिबक सिंचन बसविण्यासाठी मजूर लागतात. जमिनीखाली १० इंच सबसरफेस सिंचन असल्याने ठिबक पुन्हा काढायचे व बसवायचा हा त्रास वाचतो. शिवाय, उसाचे पाचट पेटल्यास ठिबकच्या नळ्या जळण्याचा धोका संभवत नाही. तिसरी महत्त्वाची गोष्ट अशी की, वरच्या ठिबक सिंचनामुळे मुळाशी पाणी १० मिनिटांनी पोहोचते. तुलनेने 'सबसरफेस' पद्धतीत थेट ॲक्टिव्ह मुळाशी पाणी दिले जाते. यातून १० मिनिटांची वीज आणि पाण्याची महत्त्वपूर्ण बचत साध्य होते. पाण्याच्या थेंब अन् थेंबाचा कार्यक्षम वापर याद्वारे होतो. तसेच खतांचेही व्यवस्थापन चांगले करता येते. असे अनेक फायदे 'सबसरफेस'चे आहेत. या पद्धतीचा अवलंब करून पाणी, वीज आणि श्रम यांची बचत करता येते, असा त्यांचा अनुभव आहे.

*


संपर्क : संजीव माने
आष्टा, ता. वाळवा, जि. सांगली
मो. नं.९४०४३६७५१८


## बराक ओबामांची भेट अविस्मरणीय

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष बराक ओबामा हे सन २०१० मध्ये भारत दौऱ्यावर आले होते. भारतातील शेतीविषयी कुतूहल असलेल्या ओबामा यांनी त्यावेळी मुंबई भेटीत 'जैन इरिगेशन सिस्टिम्स लि.' कंपनीच्या दालनास भेट दिली. त्यावेळी ठिबक सिंचनाचा अवलंब करणारा यशस्वी शेतकरी म्हणून 'जैन इरिगेशन सिस्टिम्स लि.' कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक अनिल जैन यांनी संजीव माने यांची ओबामांशी ओळख करून दिली. भारतात एकरी २७ टन ऊस उत्पादनाची सरासरी आहे; पण माने यांनी ठिबक तंत्रज्ञान वापरून केवळ ९ एकर क्षेत्रात चौपट उच्चांकी उत्पादन घेतल्याचे अनिलभाऊंनी ओबामा यांना आवर्जून सांगितले. त्यावेळी माने यांनी ओबामा यांच्याशी सुसंवाद साधला. माने सांगतात की, बराक ओबामा यांची भेट हा आपल्या आयुष्यातील अविस्मरणीय क्षण आहे. भारतातील सरासरी ऊस उत्पादनाच्या चारपट उत्पादन घेण्याची किमया केली तरी कशी? असा प्रश्न ओबामा यांनी विचारला. ओबामा यांनी त्यांच्या सहकाऱ्यांना अमेरिकेची एकरी उसाची उत्पादनक्षमता काय आहे, असे विचारल्याक्षणी, २८ टन असे उत्तर मी देताच ओबामांचे डोळे विस्फारले. आपल्या देशाच्या सरासरी उत्पादनापेक्षा चारपट उत्पादन घेणारा शेतकरी म्हणून त्यांनी माझे खास अभिनंदनही केले. *



**विशेष मुलाखत**

# आगामी काळ कृषी प्रक्रियेचा!
## - भवरलाल जैन

भारतातील सूक्ष्मसिंचन क्रांतीचे प्रणेते व जळगावस्थित 'जैन इरिगेशन सिस्टिम्स् लि.' चे संस्थापक अध्यक्ष पद्मश्री डॉ. भवरलाल जैन यांचा १२ डिसेंबर २०१२ रोजी अमृतमहोत्सव साजरा होत आहे. या ७५ वर्षांच्या जीवनप्रवासात शेती व शेतकऱ्यांच्या जीवनात खऱ्या अर्थाने 'माईल स्टोन' (मैलाचा दगड) ठरतील, असे अनेक बदल त्यांनी घडवून आणले आहेत. या वयातही शेती क्षेत्रात क्रांती करण्यासाठी त्यांचे हात शिवशिवत असतात. आगामी काळातील भारतीय शेतीतील बदल आणि भवितव्य याबाबत खास सा. 'आधुनिक किसान'जवळ त्यांनी दिलखुलास तसेच परखडपणे काही मते मांडली आहेत.

**- शैलेंद्र चव्हाण / जळगाव**

**आपण उद्योग-व्यवसायाची सुरुवात कधी केली व त्याचा पाया कशावर उभा आहे?**

मी १९६२ मध्ये शेती व शेतीशी निगडित उद्योग व्यवसायाकडे वळलो. 'जैन ब्रदर्स' नावाने बी-बियाणे, खत विक्री, कृषी केंद्र सुरू केले. त्याचवेळी विचारपूर्वक एक ध्येयवाक्य निश्चित केले. ते होते, ''शेती आणि शेतकऱ्यांच्या प्रश्नांचा व समस्यांचा जवळून अभ्यास करणारे तसेच सातत्याने त्यांच्या गरजा भागविणारी संस्था'' या ध्येयवाक्यानुरूप सुरू केलेली वाटचाल आजही म्हणजे तब्बल ५२ वर्षांनंतरही कायम आहे. थोडक्यात काय तर कष्ट, नावीन्याचा ध्यास, सचोटी, प्रामाणिकपणा व विश्वासार्हतेवरच आमच्या संस्थेचा पाया भक्कमपणे उभा आहे.

**शेती व शेत[illegible]यांसाठी 'मैलाचा दगड' ठरतील, अ[illegible]णते उपक्रम आपण कंपनीच्या [illegible]तून पूर्ण के[illegible]ले, असे आपल्याला [illegible]?**

शेतकरी [illegible]ादन घेत होते. मात्र त्यांच्या शेतमालाला हमीदर नव्हता. शिवाय, मूल्यवर्धित दर (व्हॅल्यू ॲडिशन) मिळणाऱ्या पिकांचे उत्पादनही अभावानेच व्हायचे. ही बाब लक्षात घेऊन १९७८ ला मी पपईच्या चिकापासून 'पेपेन' तयार करणारा कारखाना सुरू केला. करार शेती व प्रक्रिया उद्योगातील हा पहिलाच प्रयोग होता आणि माझ्या दृष्टीने तो 'मैलाचा दगड' ठरला. इच्छुक शेतकऱ्यांना पपई लागवडीसाठी प्रोत्साहन म्हणून 'ॲडव्हान्स'ही उपलब्ध करून दिला. शिवाय, लागवडीपूर्वीच खरेदीचा हमीदर निश्चित करून तालुकानिहाय पपई खरेदी केंद्र सुरू केले. 'जैन ब्रदर्स' च्या माध्यमातून शेतकऱ्यांची कमावलेली विश्वासार्हता येथे कामी आली. प्रचंड प्रतिसाद मिळाला. अवघ्या ५ ते ६ वर्षांतच शासनाने सर्वाधिक पेपेन निर्यात करणारी उत्पादक कंपनी म्हणून संस्थेला गौरविले. जगातील आघाडीचे दर्जेदार उत्पादक म्हणून ही संस्था नावारूपाला आली व त्यातून [illegible]साही कंपनीच्या गाठीशी बांधला गेला.

(... पान २६ वर)


शेती तंत्रज्ञानाची गंगोत्री
भारत
ॲग्रो इंजिनीअर्स
THE POWER IS HERE
सर्व पिकांसाठी मल्चिंग पेपर किफायती किंमतीत
उपलब्ध, पॉन्ड लाईनिंग
तालुकानिहाय विक्रेते आमंत्रित
शेतकऱ्यांचा खरा मित्र
शेतकऱ्यांचा विश्वास पात्र
Jain Turbo Slim
JAIN
Jain Irrigation Systems Ltd.
भारत
एन्टरप्रायझेस
शेतक-यांचे विश्वासू + हितचिंतक
जळगांव :- शॉप नं. १, २, स्टेशन कॉम्पलेक्स, १ विंग, जळगांव
फोन नं. ०२५७ - २२३७७०८, मो. ९४२३१८६१६०
फैजपूर : यावल रोड, फैजपूर. फोन नं. ०२५८५ - २४५११५
मो. ९४०५७६४४३६

'पीव्हीसी' पाईपच्या उत्पादनालाही याच कालावधीत सुरुवात केली होती. हीदेखील माझ्या दृष्टीने दुसरी मोठी क्रांती होती. पाईप जोडणीमुळे नदीवरून धो-धो वाहून जाणारे पाणी तब्बल १० ते १२ किलोमीटरवरून उपसा सिंचनाने शेतात आणणे, हे शेतकऱ्यांचे स्वप्न प्रत्यक्षात साकारले गेले. ही बाब माझ्या दृष्टीने जास्त महत्त्वाची आहे. त्यामुळेच कोरडवाहू शेती बागायतीखाली आली. शेतकऱ्यांचे उत्पादनही वाढले. १९८२-८३ पर्यंत पीव्हीसी पाईप उत्पादन व विक्रीत कंपनीचा वाटा १८ टक्क्यांपर्यंत पोहोचला व ती देशातील अव्वल कंपनी ठरली.

पाण्याच्या बाबतीत माझा अभ्यास पक्का होता. भारतात त्यातही महाराष्ट्रात ठिबकची गरज मोठी होती. त्यामुळेच १९८७-८८ मध्ये आम्ही सूक्ष्म सिंचन प्रणाली आणली. ही महाक्रांती ठरली. महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री शरद पवार यांनी १९८५ मध्येच महाराष्ट्रात अनुदानित स्वरूपात ठिबकची योजना लागू केली. याचा पुरेपूर लाभ जर कोणी घेतला असेल तर तो 'जैन इरिगेशन'ने! या योजनेचे फलित लक्षात घेऊन नंतर केंद्र सरकारने ही योजना स्वीकारली.

शेतमालाची कमी कालावधीत उत्पादकता वाढीसाठी माझा प्रयत्नपूर्वक अभ्यास व माहिती घेणे सुरू होते. अशातच १९८५-८६ मध्ये मी व माझे काही सहकारी इस्राईलला गेलो होतो. ऊतिसंवर्धित (टिश्यू कल्चर) रोपांची माहिती मिळाली. त्याचा अभ्यास करून, भारतीय हवामान चाचण्या घेतल्यानंतर 'जैन इरिगेशन'ने त्याची निर्मिती सुरू केली. केळीची रोगविरहीत, एकसारखी रोपे तसेच उत्पादनाचा कालावधी अवघा ११ महिने (जो पारंपरिक केळीसाठी १८ महिने आहे) व उत्पादनात अडीच ते तिप्पट वाढ शेतकऱ्यांना मिळाली. आता डाळिंबातही ऊतिसंवर्धित रोपांची निर्मिती सुरू केली असून, त्यालाही भरघोस प्रतिसाद आहे. याचे फायदे लक्षात आल्यामुळे शेतकरी केळी व डाळिंबासाठी ६ ते ८ महिने आगाऊ पैसे भरून नोंदणी करू लागले. हीदेखील एक क्रांतीच नाही का ?

**अजून काही करणे बाकी राहिले आहे, असे वाटते का ?**

'वर्क इज लाईफ ॲण्ड लाईफ इज वर्क' या तत्त्वानुसारच मी आयुष्यभर काम करीत आलो आहे, करीत राहीन.

सौरऊर्जेवर निर्मित शेतीपंप, हा त्याचाच एक भाग आहे. १९९५-९६ पासूनच मी हा विषय हातात घेतला आहे. पाण्याची टंचाई त्याआगोदरपासूनच जाणवत होती. पाणी कमी झाले, संपले की, त्याचा ऊर्जानिर्मितीवर प्रतिकूल परिणाम होणार, याही गोष्टीची जाणीव होतीच. अशा स्थितीत थोडेफार उपलब्ध पाणी विजेशिवाय पिकांना कसे देणार, असा प्रश्न शेतकऱ्यांना पडेल. तेव्हा 'तहान लागल्यावर विहीर खोदण्यापेक्षा उद्याची तयारी आजपासून केलेली बरी' या उक्तीनुसार या विषयावर तत्काळ काम सुरू केले होते. त्यात यशही आले. आता सौरऊर्जेवरील शेतीपंप खरेदीसाठी शासनाच्या अनुदानित योजना येताहेत, हेदेखील मी येथे मुद्दाम सांगू इच्छितो. शेतकऱ्यांच्या जीवनात हे पंप फार मोठी क्रांती करतील, असा माझा विश्वास आहे.

**अमृतमहोत्सवानिमित्त आपल्या ७५ वर्षांच्या प्रवासाबद्दल काय वाटते ?**

शेती आणि शेतकरी हाच माझ्या विचारांचा, कार्याचा व जीवनाचा केंद्रबिंदू मानूनच मी काम केले आणि त्याच दृष्टिकोनातून मी या प्रवासाकडे बघतो, बघितले. शेतकऱ्याची उत्पादकता वाढलीच पाहिजे, यासाठीच सर्व प्रयत्न होते. ठिबकच्या तंत्राने तर अक्षरशः जादूची कांडी फिरवल्यासारखे काम केले. महाराष्ट्रासह देशातील अनेक राज्यांत ठिबकवर कपाशी घेतली जाते. यामुळे कापसाची एकरी उत्पादकता वाढली. ठिबक नसते तर हे शक्य



नव्हते. पाट, बंधारे, धरणे यांच्यावर शेती अवलंबून असती, तर आजच्यासारखी प्रगती साध्य करायला अजून १५ ते २० वर्षे लागली असती. अर्थात, शासकीय अनुदानाशिवाय जेवढ्या वेगाने ठिबकचा प्रसार झाला, उत्पादकता वाढली, शेतकऱ्यांची प्रगती झाली, ती साध्य झाली नसती, हे प्रामाणिकपणे कबूल करायलाच हवे. पीव्हीसी पाईप, ऊतिसंवर्धित रोपे हे मात्र विनाअनुदानित विकसित केले. 'जैन इरिगेशन'ने विकसित केलेले प्रत्येक साधन, तंत्र शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी तसेच विक्रीपश्चात सुविधा पुरविण्यासाठी राज्यात १२०० वितरकांचे जाळे उभारले. मोफत तांत्रिक सल्ला, कृषी विस्तार कार्याला प्राधान्य दिले. कृषी विस्तार अधिकारी, अभियंते यांची संख्या आज 'जैन इरिगेशन'जवळ जितकी आहे तितकी कोणत्याच खाजगी संस्थेकडे नाही. शासकीय कर्मचारी, अधिकाऱ्यांच्या संख्येनंतर आपलाच क्रमांक लागलो. व्यवसायाच्या सुरुवातीपासून सामाजिक बांधिलकीही जपली. व्यवसाय वृद्धीबरोबरच साक्षरतेसाठी मोठे प्रयत्न केले.

**भारतीय शेतीचे भवितव्य कसे असेल ?**

येणाऱ्या काळात खुली शेती परवडणार नाही. त्याऐवजी शेडनेट, पॉली हाऊस, ग्रीन हाऊस या शेतीकडे हळूहळू कल वाढेल व तोच फायदेशीरही ठरेल. शेतकऱ्यांना आजच्यापेक्षा जास्त पण कमी खर्चिक व सहजपणे कर्ज मिळेल, यात शंका नाही. विविध कृषी उत्पादनांसाठीचे अनुदान थेट लाभार्थीच्या खात्यावरच जमा होईल. यामुळे वेळेत बचत होईल, भ्रष्टाचाराला आळा बसेल. शेतकरी बाजारपेठेचा अंदाज घेऊन शेती करू लागतील. असे असले तरी शेती अजून अधिक फायदेशीर होण्यासाठी तसेच शेतीवरील एकूण भार बघता शेतीपूरक व्यवसाय व प्रक्रिया उद्योग वाढीशिवाय पर्याय नाही. शेतकऱ्यांच्या उन्नतीसाठी अशा प्रकारच्या 'मूल्यवर्धना'ची गरज प्रखरपणे जाणवते आहे. भविष्यात ती आणखी मोठ्या स्वरूपात समोर येईल. आधुनिक शेतीला माहिती तंत्राची जोड दिल्यास तरुण पिढी आपोआपच शेतीकडे वळेल. या सर्व गोष्टी घडून आल्यास भारतीय शेतीला नक्कीच चांगले दिवस येतील. ❋



शेतीत आधुनिक तंत्रज्ञानाला कष्टाची जोड देत माळरानावर कार्नेशन फुलांची शेती फुलविणाऱ्या मनीषा भाऊसाहेब कुंजीर यांची जिद्द काही औरच. जिद्द, चिकाटी, आत्मविश्वास व आधुनिक तंत्रज्ञानाच्या बळावर त्यांनी शेतीत नेत्रदीपक प्रगती तर केलीच; शिवाय कुंजीर कुटुंबाचे आयुष्यही बदलून टाकले. त्यामुळेच कधी काळी त्यांच्या सासऱ्यांनी बांधलेल्या पत्र्याच्या घराऐवजी आता तिथे एक टूमदार बंगला साकारला आहे. कष्ट व आधुनिक तंत्रावर जेवढी मनीषाताईंची धारणा आहे तेवढीच स्वामी समर्थांच्या भक्तीवरही! त्यांच्या प्रेरणेतून इतर शेतकऱ्यांनी पॉलीहाऊस व जैन तंत्रज्ञानाचा कित्ता गिरविला, हे विशेष!

# पॉलीहाऊसमध्ये बहरली कार्नेशन फूलशेती

पुणे जिल्ह्यातील दिवेघाट ओलांडला की, पुरंदरचा प्रांत सुरू होतो. डोंगरी भाग असल्यामुळे इथल्या जमिनीही खडकाळ वळणाच्या, शेताला मातीसुद्धा जुजबीच. या माळरानातच आठशे घरांचं एक छोटसं गाव वाघापूर. जेजुरी व उरळी कांचनच्या मध्यभागी. या भागात खडकाळ जमिनीसोबतच पाण्याचे दुर्भिक्ष्य. इथले शेतकरी गेल्या अनेक वर्षांपासून निसर्गाच्या या दुष्टचक्रात अडकलेले. त्यापैकीच वाघापूरचे कुंजीर कुटुंब. सर्जेराव कुंजीर हे या कुटुंबाचे प्रमुख. जुन्याच वळणानं त्यांचं नांगर चाललं ते ज्वारी, बाजरी फार तर सीताफळांपुरतं. भाऊसाहेब हा त्यांचा एकुलता एक मुलगा. शेतात फारसं काही हाती न लागल्यामुळे डी. एड. करून त्यांनी शिक्षकी पेशाला पसंती दिली. उच्च कृषी तंत्रज्ञानाच्या अभावामुळं शेतीतील नैराश्य अधिकच वाढत गेलं.

### ...अन् बहरली कार्नेशन फूलशेती!

भाऊसाहेबांना शिक्षकाची नोकरी लागल्याबरोबर सर्जेरावांनी मुलाचे दोनाचे चार हात केले. मनीषा नावाच्या तरुणीशी भाऊसाहेबांचा विवाह झाला. पाणलोटचा आदर्श निर्माण करणाऱ्या हिवरे बाजार (जि. अहमदनगर) ची ही कन्या (मनीषा) वाघापूरच्या कुंजीर कुटुंबात आली, ती लक्ष्मीची पावले घेऊनच...! सासरी सहा एकर शेती असल्याची हिवरे बाजारच्या या कन्येला कल्पना होती. मनीषाताईंचे सुरुवातीची दहा वर्षे संसाराचा गाढा ओढण्यातच गेले. मुलगी श्वेता आणि मुलगा सुरज यांचं लहानपण सांभाळताना जे काही चटके त्यांना सोसावे लागले, त्यातून त्यांचं लक्ष शेतीवर केंद्रित झाले. पूर्वापार चालत आलेल्या पारंपरिक शेतीपेक्षा वेगळं काही करता येईल का, या विचाराने मनीषाताई अस्वस्थ झाल्या. या अस्वस्थतेनं त्यांनी वाचन सुरू केलं. एक दिवस अशाच वाचनातून पुण्याजवळच असलेल्या कार्नेशन फूलशेतीबद्दल त्यांना माहिती मिळाली आणि या फूलशेतीनं मनीषाताईंना भुरळ घातली. घरच्यांच्या मागं लागून सरळ त्यांनी या कार्नेशन फूलशेतीचा बांध गाठला. या बांधावरच यशोगाथेला जन्म घालणाऱ्या प्रगतिशील शेतकऱ्याकडून जमेल तेवढ्या व समजेल तेवढ्या तांत्रिक माहितीचं बळ घेऊन त्यांनी सरळ वाघापूर गाठलं. सुरुवातीच्या प्रायोगिक काळात जैन ठिबकच्या सहाय्यानं उपलब्ध असलेल्या पाण्याचा काटकसरीनं वापर करीत निशिगंधाची बाग, भुईमूग, कांदा आणि जोडीला सीताफळही बहरले. जैन इरिगेशन सिस्टिम्स लि. कंपनीच्या या तंत्रानं त्यांच्या मनात आत्मविश्वास निर्माण केला.

### पॉलीहाऊसमध्ये ठिबक तंत्राचा वापर

उपलब्ध असलेल्या शेतजमिनीतून अधिकाधिक उत्पन्न घेण्यासाठी त्यांना फूलशेतीचा मार्ग खात्रीचा वाटला. या फूलशेतीसाठी पॉलीहाऊस आणि याच्या जोडीला लागणारं ठिबक सिंचन व सूक्ष्मसिंचन तंत्रज्ञान समजून घेणं महत्त्वाचं होतं. जैन इरिगेशन कंपनीच्या [illegible] कांचन येथील वितरक व [illegible]नी त्यांना हे तंत्र सोपं करून दिलं. मनीषाताईंनी पॉलीहाऊसची भाषा आणि तंत्र आपल्या शेतात रुजवायचं ठरवलं. धाडस मोठं होतं. लागणारी गुंतवणूक त्याच्यापेक्षाही मोठी होती. गुंतवणुकीपूर्वी बाजाराचा अभ्यास करायला त्या चुकल्या नाहीत. जरबेरा व इतर फुलांपेक्षा कार्नेशन फुलाचं विपुल आयुष्य व त्याला बाजारात असलेली मागणी त्यांच्या नजरेतून सुटली नाही. पॉलीहाऊस तज्ज्ञांच्या मदतीनं त्यांनी आपल्या ६ एकरांपैकी १० गुंठ्याच्या जागेत पॉलीहाऊस



पुणे जिल्ह्यातील वाघापूर येथील माळरानावर कार्नेशन फुलांची शेती फुलविणाऱ्या मनीषा भाऊसाहेब कुंजीर.




जैन इरिगेशन सिस्टिम्स लि. तर्फे दिला जाणारा पद्मश्री डॉ. अप्पासाहेब पवार आधुनिक कृषी उच्च व तंत्र पुरस्कार केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार यांच्या हस्ते स्वीकारताना मनीषा कुंजीर व भाऊसाहेब कुंजीर. सोबत भवरलाल जैन, कवी ना. धों. महानोर, सहकारमंत्री हर्षवर्धन पाटील, विधानसभेचे विरोधी पक्षनेते एकनाथ खडसे, आ. सुरेश जैन, खा. ए. टी. पाटील, मंत्री डॉ. विजयकुमार गावित, गुलाबराव देवकर आदी.

उभारले. केंद्र सरकारच्या राष्ट्रीय फलोद्यान अभियानांतर्गत अनुदानासह त्यांना बँक ऑफ इंडियाकडून ९ लाख ३३ हजार रुपयांचे कर्ज मिळाले. यात योजनेनुसार २५ टक्के स्वत:चा वाटाही त्यांनी उचलला. उपलब्ध असलेल्या मोजक्याच पाण्याच्या नियोजनासाठी त्यांनी पॉलीहाऊसमध्ये ठिबक तंत्राचा पुरेपूर उपयोग करून घेतला. स्वप्न वास्तवात उतरल्यानंतर त्यांना काही आव्हानांनाही सामोरं जावं लागलं. २०१० च्या 'फयान' वादळात पॉलीहाऊसचं छप्पर मोडलं. पुन्हा उभ्या राहणार नाहीत त्या मनीषाताई कसल्या? आज त्यांचं पॉलीहाऊस 'कार्नेशन हाऊस'मध्ये रूपांतरित झालं आहे.

## पाणी, खतांचे काटेकोर व्यवस्थापन

पुण्याच्या बाजारपेठेत कार्नेशनच्या १९ फुलांच्या एका गुच्छाला साधारणत: २०० रुपयांपर्यंत भाव मिळतो. यात लग्नसराई, सणवार असेल तर भाव आणखी वाढून मिळतात. १० गुंठ्यावरील मनीषाताईंच्या पॉलीहाऊसच्या व्यवस्थापनासाठी महिन्याला साधारणत: १५ हजार रुपये खर्च येतो. या बोडक्या माळरानावर मनीषाताईंनी घसघशीत कमाई करून सर्वांना आश्चर्याचा धक्का दिला. मनीषाताईंनी कर्ज फेडायला उशीर केला नाही. त्यांची शेती त्यांच्या हातानं, कष्टानं बहरलेली आहे. बहरलेली ही फुलं या कष्टातली आहेत. ठिबक संचाच्या देखभाल व निगेपासून ते खताच्या नियोजनापर्यंत सर्व काही त्यांनी माहीत करून घेतलं आहे. या श्रमाला कुंजीर परिवारातील सदस्यांचीही जोड मिळाली आहे. कधीकाळी सासऱ्यांनी बांधलेल्या पत्र्याच्या घराऐवजी आता तिथं एक टूमदार बंगला उभारला आहे. मनीषाताईंची धारणा जेवढी कष्ट व आधुनिक तंत्रावर आहे, तेवढीच श्री स्वामी समर्थांच्या भक्तीवरही..! त्यांच्या प्रेरणेतून इतर शेतकऱ्यांनी पॉलीहाऊस व जैन तंत्रज्ञानाचा कित्ता गिरविला आहे, हे विशेष. या प्रगतीत विजेचा अडसर येतो, याचीही त्यांना जाणीव झाली आहे. त्यामुळंच आता शेतीला जैन सौरतंत्रज्ञानाची जोड देण्याचा त्यांचा विचार आहे. जैन सौरऊर्जा पंपाच्या सहाय्याने त्यांना स्वयंचलित ठिबक व सूक्ष्मसिंचन यंत्रणा अंगीकारायची आहे. हमखास विजेची उपलब्धता या सौर तंत्रज्ञानातच असल्याचं त्यांच्या लक्षात आलं आहे.

मनीषाताईंची शेती शिकण्यासाठी वर्षाकाठी किमान ५ हजार शेतकरी त्यांच्या पॉलीहाऊसला भेट देतात. येईल त्यांना शेतीचा हा प्रगतिशील मंत्र देताना त्या कुठेही कमी पडत नाहीत. दहा गुंठ्यावर उभारलेल्या पॉलीहाऊसमधील कार्नेशन शेतीला तीन वर्षे पूर्ण झाल्यानंतर त्यांनी नव्यानं लागवड करून घेतली आहे. तीन वर्षांत त्यांनी सहा लाख फुलांचे उत्पादन करून बाजारात पाठविले. पॉलीहाऊस उभारणीपासून ते विपणनापर्यंतच्या तीन वर्षांच्या काळात त्यांना एकूण १२ लाख रुपये खर्च आला, तर २५ लाख रुपयांचं उत्पादन मिळालं. मनीषाताई आता कृषी विस्तार शिक्षणातील एक दूत झाल्या आहेत. *

**संपर्क : मनीषा भाऊसाहेब कुंजीर**
**वाघापूर, जि. पुणे, मो. नं. ९६२३४१६८९७**

**केंद्रीय कृषिमंत्री मा. श्री. शरदचंद्रजी पवार साहेब यांच्या ७२ व्या वाढदिवसानिमित्त हार्दिक शुभेच्छा!**



ना. शरदचंद्रजी पवार



कमलकिशोर कदम



आ. जयप्रकाशजी दांडेगावकर

**पूर्णा ग्रुप ऑफ इंडस्ट्रिज**

१) पूर्णा सहकारी साखर कारखाना लि., वसमतनगर युनिट क्र. १
२) पूर्णा सहकारी साखर कारखाना लि., युनिट क्र. २
३) १८ MV सहवीजनिर्मिती प्रकल्प कार्यान्वित
४) ३० KLPD क्षमतेचा आसवणी प्रकल्प कार्यान्वित
५) २० KLPD क्षमतेचा इथेनॉल प्रकल्प कार्यान्वित

**आमची दर्जेदार उत्पादने**

• शुभ्र दाणेदार साखर • औद्योगिक व मद्यार्क निर्मितीसाठी अल्कोहोल व इथेनॉलचे उत्पादन
• वीजनिर्मिती पूर्णा – ११ भूसंवर्धक

(पी. पी. चव्हाण) कार्यकारी संचालक
(राजेंद्र जाधव–महागावकर) उपाध्यक्ष
(आ. जयप्रकाश दांडेगावकर) अध्यक्ष

सन्मा. संचालक मंडळ

सर्वश्री कमलकिशोर कदम, बापूराव बेले, रावसाहेब इंगोले, विश्वनाथ चव्हाण, शिवाजीराव सवराते, शहाजीराव देसाई, बापूराव घाटोळ, डॉ. संजय लोलगे, रुस्तुमराव वंजे, गोरखनाथ पाटील, राजाभाऊ भालेराव, सौ. कुशावर्ताबाई चवन, सौ. अंजनाबाई झुंझुर्डे, श्रीमती पार्वतीबाई पढोळे, पंडितराव बुचाले, बाळासाहेब कदम, प्रल्हादराव काळे, दत्तराव चव्हाण, प्रल्हादराव सावंत, बाळासाहेब बारहाते, चंद्रमुनी मस्के, उत्तमराव लोखंडे, रघुनाथ झाखोरे,
श्री. जी. हेलेंकर–मुख्य कार्यकारी अधिकारी, प्रादेशिक सहसंचालक (साखर) नांदेड.





मा. भवरलाल जैन यांच्या
अमृतमहोत्सवी वाढदिवसानिमित्त
हार्दिक शुभेच्छा

शुभेच्छुक
विशाल पटेल
९४२२२६४००८, ९१५८१५५८५९

**श्री कृषिमंदिर**

अधिकृत विक्रेते : जैन पाईप व जैन ठिबक

गाळा नं. ११ व २०, काकाणी शॉपिंग सेंटर,
छत्रपती शिवाजी पुतळ्याजवळ, मालेगाव, जि. नाशिक – ४२३२०३





जिल्हा कमांडर
राष्ट्रपती पदक विजेते

**बंदूक घर**

मोठा आवाज




आपल्या घर, शेती, वस्ती, सराफी पेढी, बँक, पेट्रोल पंपचे संरक्षण करा..!

► लाईसेंसची आवश्यकता नाही

• सरकारमान्य एअररायफल, एअर पिस्तोल

शोरुम– बंदुक घर, हॉटेल सनमुन, बजाज शोरुम समोर श्रीरामपूर

9890897472, 922531313



*मा. शरदरावजी पवार यांच्या वाढदिवसानिमित्त शुभेच्छा!*

**कृषी उत्पन्न बाजार समिती, पारनेर**

ता. पारनेर, जिल्हा अहमदनगर
उपबाजार – निघोज, टाकळी ढोकेश्वर, भाळवणी
फोन नं. ०२४८८–२२१७५७, २२२४५७



काशिनाथ दाते (सर)
सभापती



सुभाषराव कावरे
सचिव



अरुणराव ठाणगे
उपसभापती

आपले नम्र

**संचालक मंडळ**

| | | | |
|---|---|---|---|
| प्रशांतराव गायकवाड | मारुती रेपाळे | गंगाधर शेळके | साहेबराव बुगे |
| संजय भगत | विजय आवारी | वसंतराव मोरे | भाऊसाहेब खोडदे |
| भाऊ लामखडे | लहू थोरात | झुंबराबाई औटी | |
| रंभा कांडेकर | भागाजी गावडे | सोनबा भापकर | |
| अशोकलाल कटारिया | शिवाजी खिलारी | संदीप वराळ | |